# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

**निवडणूक महत्वाचे** जा.क्र.रासनिप्रा/नि.वि.व प्रा.वि.वृत्तपत्रात प्र.हो.वृत्त/ १०९३ /२०१४
दिनांक :१८/१२/२०१४.

<u>वाचावे</u> :-

**१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३कब(१).**
**२) शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३.**
**३) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक).नियम २०१४.**

## -: <u>परिपत्रक</u> :-

**विषय:- निवडणूक विषयक आणि प्राधिकरण विषयक वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारे वृत्तावर वेळेत कार्यवाही करणेबाबत.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दिनांक १३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३कब (१) नुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण झाले आहे. व त्या नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक). नियम २०१४ नियम २ (८) व २ (२०) नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणेसाठी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (DCEO व TCEO) यांना त्या – त्या वैधानिक अधिकार क्षेत्राकरीता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्राधिकरणाने घोषित केलेले आहे.

त्यानुसार निवडणूकीच्या अनुषंगाने वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तावर त्या – त्या क्षेत्रातील DCEO व TCEO यांचेकडून तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच सदर कात्रणाची स्वतंत्र धारिका ठेवावी.वृत्तपत्रात आलेल्या वृतपत्रावर कार्यवाही करुन त्याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधकांमार्फत प्राधिकरणास अवगत करण्यात यावे. उपरोक्त विषयी कार्यवाही करणे बाबत काही समस्या उद्भवल्यास सदर बाब त्वरित वरिष्ठ कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, यांचे मान्यतेने**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१) जिल्हा उपनिबंधक, (सर्व)
२) तालुका/प्रभाग, सहकार निवडणूक अधिकारी, (सर्व)